# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००००८३**

**अपिलार्थी श्री. मनिष बालकृष्ण जोशी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा ALA/A**
रुम नं. ५२१, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा LA/A(I/C)**
रुम नं. ५२१, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०५.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित

विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)

प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलदिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.०८.२०२३ | २२.०८.२०२३/२५.१०.२०२३ | २६.०९.२०२३ | २०.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २१.१२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये पूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २२.०८.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २०.१०.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०७.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती: *"Golibar Co-op. Housing Society Ltd. Vs Shri P.S. Berry, the Collector of Bombay Suburban Dist. and others the said information is between 1963 to 1980.*

*(1) Plaintiff:- Golibar CHSL, resolution and prayer and evidence. (2) Defendant :- MHADA reply and evidence. (3) Court Order, Judgement and Decree (4) Order forwarded to concerned department and address upto 1 to 4 certified copy".*

जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.१०.२०२३ रोजी जमीन व्यवस्थापक, मुंबई मंडळ, मुंबई, निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ, मुंबई व कार्यकारी अभियंता, वांद्रे विभाग, मुंबई मंडळ, मुंबई यांच्याकडे हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविले. अपिलार्थींनी माहिती न मिळाल्याने दि. २६.०९.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१०.२०२३ रोजी प्रथम अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग करुन अपिलार्थींना कळविले.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांना सदर प्रकरणी पूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस कोणतीही पुर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**२) प्रथम अपिलीय अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस कोणतीही पूर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज- २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

**३) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०१.०७.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 26-5-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २६.०५.२०२५**

# अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००८३
# अपिलार्थी श्री. मनिष बालकृष्ण जोशी
## सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५ (In continuation of order dt २६.०५.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याकारणाने त्यांचेविरुध्द शास्तीची व शिस्तभंगविषयक कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा करण्याचे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेले लेखी निवेदन दि. २३.०६.२०२५ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, मुंबई यांचे दि.०७.०५.२०२५ रोजीचे कक्ष अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे सुनावणीचे सुचना पत्र व मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, मुंबई यांचे दि. २६.०५.२०२५ रोजीचे आदेश नागरिक सुविधा केंद्र/म्हाडा (CFC-Center) यांना ट्रॅकिंग रिपोर्ट प्रमाणे अनुक्रमे दि. १५.०५.२०२५ व दि. ०३.०६.२०२५ रोजी प्राप्त झाले. सदर बाब विधी सल्लागार /प्राधिकरण (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०६.२०२५ रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेले लेखी निवेदन दि. १६.०६.२०२५ आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांनी दिलेले दि.२६.०५.२०२५ रोजीचे आदेश मला दि. ०३.०६.२०२५ रोजी प्राप्त झाले. माझ्या अनुपस्थितीबाबतच्या अनुषंगाने दिलेले आदेश लक्षात घेवून व त्याबाबतच्या नमुद केलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने म्हाडातर्फे नव्याने सुरु केलेल्या नागरिक सुविधा केंद्रामध्ये चौकशी केली असता त्यांनी दि. ०७.०५.२०२५ रोजीचे सुचनापत्र काही अपरिहार्य कारणामुळे पाठविले नसल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मागील सुनावणीस अनुपस्थितीबाबत दिलगीरी व्यक्त करुन शास्तीची व शिस्तभंगाची कार्यवाही क्षमापित करण्याची विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि.०१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीना ४० पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अभिलेखावर सन- १९६३ ची मुळ नस्ती सादर केली. अपिलार्थी यांनी मान्य केले की, त्यांना दि. ०१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती प्राप्त झालेली आहे. परंतु, त्यांना अधिकची माहिती अपेक्षित आहे. जर आता सन- १९६३ ची मुळ नस्ती प्राप्त झाली तर निरीक्षणाची विनंती केली. सुनावणी दरम्यान अपिलार्थीना संबंधीत नस्ती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात आली. अपिलार्थी यांनी असे सादर केले की, जरी त्यांचे माहिती अर्जात नमुद नसले तरी त्यांना संपूर्ण नस्तीची छायांकित प्रत मिळावी. संबंधीत नस्तीमध्ये अंदाजे ६५० पृष्ठे आहेत.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे शासकीय शुल्क आकारुन संबंधीत संपूर्ण नस्तीची छायांकित प्रत अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

2-7-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**